लक्षवेधी

यूपीमध्ये एकाच कुटुंबातील ५ जण कारमध्ये जिवंत जळाले

गोवन वार्ता । अनुपशहर : बुलंदशहरमध्ये झालेल्या एका रस्ते अपघातात कारमधील एकाच कुटुंबातील ५ जणांचा जळून मृत्यू झाला. भरधाव वेगाने येणारी स्विफ्ट कार पुलाला धडकली आणि रस्त्याच्या कडेला ५ फूट खाली कोसळली. पडताच कारमध्ये मोठी आग लागली. कारमध्ये बसलेल्या ६ पैकी ५ जण जिवंत जळून खाक झाले. या अपघातात कारमधील फक्त एक महिला बचावली. पुलाला धडकल्याने ती कारमधून खाली पडली. तिचे दोन्ही पाय तुटले. तिला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांचा मुलगा यांचा समावेश आहे. या अपघातात पत्नीचा भाऊ आणि त्याची पत्नी यांचाही मृत्यू झाला.

दरीत कोसळून २ यात्रेकरू ठार

गोवन वार्ता । केदारनाथ : केदारनाथ यात्रेच्या मार्गावर बुधवारी सकाळी मोठा अपघात घडला. गौरीकुंड आणि रामबाडा दरम्यानच्या जंगल चट्टी भागात पोल क्रमांक १५३जवळ काही यात्रेकरू दरीत कोसळले. या दुर्घटनेत २ जणांचा मृत्यू झाला. ३ जण जखमी झाले. १ व्यक्ती बेपत्ता असून, त्याचा शोध सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच डीडीआरएफ आणि पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले आणि तत्काळ बचावकार्य हाती घेतले. प्राथमिक माहितीप्रमाणे, २ मृतदेह आणि एक जखमी व्यक्तीला रेस्क्यू करून गौरीकुंड येथे हलवण्यात आले आहे. बाकी जखमी आणि बेपत्ता व्यक्तींच्या शोधासाठी दरीमध्ये रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात आले.

जी७ मंचावरून पंतप्रधान मोदींचा जागतिक समुदायाला इशारा

दहशतवाद समर्थकांना शिक्षा हवीच

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

कनानास्किस : जी७ शिखर परिषदेत भाग घेत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक शांतता, दहशतवाद, व्यापार आणि विकास यांसारख्या प्रमुख मुद्द्यांवर जगभरातील नेत्यांशी संवाद साधला. कॅनडाच्या कनानास्किस येथे पार पडलेल्या जी७ आउटरीच सत्रात मोदींनी दहशतवादाच्या विरोधातील भारताच्या कठोर भूमिकेची पुनरावृत्ती केली आणि या आंतरराष्ट्रीय धोक्याविरोधात एकत्र येऊन निर्णायक कारवाईची गरज अधोरेखित केली. दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या देशांना त्याचे परिणाम भोगावेच लागतील. जागतिक शांततेसाठी धोरण स्पष्ट असणे आवश्यक आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले.

त्यांनी दुहेरी भूमिकेवर टीका करत म्हटले, काही देशांवर तर लगेचच निर्बंध लादले जातात, पण जे देश उघडपणे दहशतवादाला प्रोत्साहन देतात त्यांना बक्षिसे दिली जातात.

भारत-कॅनडा संबंध सुधारण्याची सुरुवात

गेल्या काही काळात भारत आणि कॅनडामध्ये तणाव असतानाही दोन्ही देशांनी नव्या उच्चायुक्तांची नेमणूक करण्यावर सहमती दर्शवली, जेणेकरून वीज, व्यापार आणि इतर सेवा सुरळीत होतील. जी-७ शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींची उपस्थिती भारताच्या जागतिक नेतृत्वातील भूमिकेला बळकट करणारी ठरली. त्यांनी दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेतली आणि विकसनशील देशांची बाजू ठामपणे मांडली.

महत्त्वाच्या नेत्यांशी द्विपक्षीय भेटी

यावेळी मोदींनी कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी, ब्रिटनचे पंतप्रधान कीअर स्टार्मर, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे-म्युंग, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केल्या.

एआय, 'डीपफेक'विषयी चिंता व्यक्त

मोदी म्हणाले, एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) हे ऊर्जा-आधारित तंत्रज्ञान आहे आणि याची गरज फक्त नवीकरणीय ऊर्जा पुरवू शकते. गेल्या शतकात स्पर्धा होती ऊर्जा मिळवण्याची, पण या शतकात तंत्रज्ञानासाठी सहकार्य आवश्यक आहे. 'डीपफेक' वरही मोदींनी चिंता व्यक्त केली. त्यांनी सुचवले की, एआयच्या सहाय्याने तयार केलेल्या सामग्रीवर स्पष्टपणे नमूद केले पाहिजे की ती कृत्रिम मेधेद्वारे बनवलेली आहे.

आत्मसमर्पण करणार नाही : खामेनेई

› अमेरिकेने हस्तक्षेप केला, तर परिणाम भोगावे लागतील

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

तेहरान : इराण आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांनी अमेरिका आणि इजरायलविरोधात कडव्या शब्दांत इशारा दिला आहे. खामेनेई यांनी मंगळवारी रात्री आणि बुधवारी सकाळी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करत अमेरिका आणि इस्रायलला थेट उद्देशून सांगितले की, इराणी राष्ट्र कधीही दबावाला किंवा हल्ल्यांसमोर झुकले नाही आणि यापुढेही झुकणार नाही. अमेरिकेने हे लक्षात ठेवावे, आम्ही आत्मसमर्पण करणार नाही.

खामेनेई म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आम्हाला धमक्या देत आहेत. पण धमक्या त्यांनाच दिल्या जातात जे घाबरतात. इराण न घाबरतो, न झुकतो. त्यांनी असा दावाही केला की, इस्रायलने आमच्यावर हल्ला केला, तेव्हा आमचे अधिकारी अमेरिकेसोबत अप्रत्यक्ष चर्चेत गुंतलेले होते, असे ते म्हणाले.

युद्ध सुरू झाले आहे : खामेनेई यांची घोषणा

मंगळवारी उशिरा खामेनेई यांनी 'एक्स'वर पोस्ट केले की, युद्ध सुरू झाले आहे. आम्ही दहशतवादी इस्रायलला सडेतोड उत्तर देऊ. कोणतीही दया दाखवली जाणार नाही. यानंतर इराणने इस्रायलवर २५ क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यांमध्ये २४ इजरायली नागरिकांचा मृत्यू झाला आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांचा खामेनेईंवर निशाणा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, आम्हाला खामेनेई कुठे आहेत, हे माहित आहे. पण त्यांना सध्या मारण्याचा आमचा हेतू नाही. त्यांनी खामेनेई यांना बिनशर्त आत्मसमर्पण करण्याचा सल्ला दिला.

वॉट्सअॅपवर बंदी, जासूसीचा आरोप

इराणी सरकारने नागरिकांना आदेश दिले आहेत की, ते वॉट्सअॅप अॅप आपल्या स्मार्टफोनमधून डिलीट करावे. कारण सरकारचा दावा आहे की या अॅपमधून माहिती थेट इस्रायलपर्यंत पोहोचते. वॉट्सअॅपने मात्र हे आरोप फेटाळून लावले आहेत.

युद्धातील मृतांची संख्या वाढली : १३ जूनपासून सुरू असलेल्या या संघर्षात आतापर्यंत इराणमध्ये ६०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर १,३०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. सरकारी आकडेवारीनुसार सोमवारपर्यंत २२४ मृत्यू आणि १,२७७ जखमींची नोंद झाली होती. इराणच्या प्रतिहल्ल्यांत २४ इस्रायली नागरिक ठार झाल्याचेही स्पष्ट झाले आहे.

३ हजार रुपयांत मिळणार वर्षभराचा फास्टॅग रिचार्ज

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

मुंबई : केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी मोठी घोषणा केली. खासगी वाहनांसाठी केंद्र सरकार आता फास्टटॅगवर आधारित एक वार्षिक पास सुविधा आणणार आहे. याची किंमत सुमारे ३ हजार रुपये असेल. ही वार्षिक पास सुविधा १५ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. या पासमुळे खासगी वाहन चालकांना कमीत कमी खर्चात आणि सुखकर प्रवास करता येणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ट्वीटरवर म्हणजेच एक्स अकाऊंटर याबाबत एक पोस्ट शेअर केली आहे. हा पास सक्रिय झाल्यानंतर, तो १ वर्षासाठी किंवा २०० फेऱ्यांसाठी (जे आधी येईल ते) वैध असेल. म्हणजेच, जर २०० फेऱ्या वेळेपूर्वी पूर्ण झाल्या तर वापरकर्त्यांना पुन्हा एकदा पासचे नूतनीकरण करावे लागेल. लवकरच या पाससाठी एनएचएआय आणि एमओआरटीएचच्या वेबसाइटवर आणि 'राजस्थान यात्रा ॲप' वर एक वेगळी लिंक उपलब्ध करून दिली जाईल.

राशीभविष्य

मेष – नोकरी व्यवसायामध्ये वादविवादाची शक्यता निर्माण होणार आहे. आपला हट्ट सोडावा लागणार आहे. जवळचा किंवा लांबचा प्रवास होण्याची शक्यता आहे. खिसा आणि पाकीट सांभाळावे.


वृषभ – महत्वाचे नेमून दिलेले काम करण्याकडे आपण पूर्ण लक्ष देणार आहात. व्यापार व्यवसायात मोठी उलाढाल कराल. आर्थिक फायदा होईल. अंदाज अचूक ठरणार आहे दिवस चांगला जाणार आहे.


मिथुन – घरातील कामांना प्राधान्य द्यावे लागणार आहे. व्यापार व्यवसायातील उलाढाल जेमतेमच असणार आहे. नोकरीमध्ये वातावरण चांगले असणार आहे.आपली जबाबदारी बदलण्याची शक्यता आहे.

कर्क – व्यापार व्यवसायातील अडकलेले पैसे मिळणार आहेत. बचतीचा विचार करणे आवश्यक आहे. नोकरीमध्ये काही कामांमध्ये अडचणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सहकाऱ्यांचे सहकार्य घ्यावे लागणार आहे.


सिंह – अचानक धनलाभ ची शक्यता आहे .उधार उसनवारी वसूल होणार आहे. आरोग्य उत्तम राहणार आहे. तुमच्या स्वतःच्या कार्यक्षेत्रात काम चांगले होणार आहे. नोकरी-व्यवसाय सांगली स्थिती राहणार.


कन्या – मनाची हुरहुर कमी होईल. चलबिचल पणा निघून जाणार आहे.आपल्यासमोर अनेक कामे असणार आहेत. तातडीच्या कामाला महत्त्व द्यावे लागणार आहे .जास्त विचारात वेळ वाया घालवू नका.

तुळ – कामाची व्यवधाने खूप असणार आहे. काम करताना लक्षपूर्वक केले पाहिजे कामांमध्ये चुका होऊ देऊ नका, तीच तीच कामे परत करावे लागण्याची शक्यता आहे. प्रवास शक्यतो टाळावे.

वृश्चिक – आपले विचार सकारात्मक असणार आहेत नोकरीमध्ये चांगली परिस्थिती असणार आहे आपणास जेवढे या पैशाची गरज आहे ती पूर्ण होणार आहे. प्रलंबित कामे पूर्ण करण्याकडे लक्ष असू द्यावे.

धनु – नोकरी मध्ये मनासारखे बदल होणार आहे.नोकरीतील नियोजन व व्यवस्थापन नीट असल्यामुळे कामे सुरळीत होणार आहे. कामे तुमची वेळेत पूर्ण कराल. टारगेट वेळेत पूर्ण झाल्यामुळे वरिष्ठ खुश असतील.

मकर – आपण धर्मापेक्षा कर्माला महत्त्व देणाऱ्या व्यक्ती आहात. आपले ठराविक महत्वाची काम पूर्ण झाल्यामुळे धार्मिक कामांमध्ये लक्ष द्याल. दानधर्म करण्याची इच्छा होईल. आनंदाचे प्रवास होतील.


कुंभ – लोकांच्या वादविवादात पडू नका. आपण बरे आणि आपले काम बरे असेच धोरण स्वीकारणे आपणासाठी आज चांगले आहे. प्रवासात काळजी घेणे आवश्यक आहे.

मीन – व्यापार-व्यवसायात आवक-जावक बऱ्यापैकी असंणार आहे. आर्थिक व्यवहार मनासारखी होतील. अपेक्षित लाभ होणार आहेत. भागी दाराशीच तडजोड करावी लागणार आहे. नवीन नियोजन कराल.

विश्वासकुमार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

दीव : एअर इंडिया विमान अपघातातून चमत्कारिकरित्या बचावलेले विश्वासकुमार रमेश यांना बुधवारी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला. त्यानंतर भावाच्या पार्थिवाला खांदा देताना त्यांचे अश्रू अनावर झाले.

१२ जून रोजी अहमदाबाद येथे घडलेल्या एअर इंडिया विमानाच्या भीषण अपघातात २४२ प्रवाशांपैकी फक्त विश्वासकुमार हेच वाचले, तर त्यांचे बंधू अजय रमेश यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोघेही लंडनला प्रवासाला निघाले होते.

अपघातात जखमी झालेल्या विश्वासकुमार यांच्यावर अहमदाबाद सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या चेहऱ्यावर आणि डाव्या हाताला गंभीर जखमा झाल्या होत्या. बुधवारी अखेर त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आले आणि त्या क्षणीच त्यांना भावाच्या अंत्यसंस्कारासाठी रवाना व्हावे लागले.

दीवमध्ये त्यांच्या घरी जेव्हा अजय रमेश यांचे पार्थिव पोहोचले, तेव्हा संपूर्ण रमेश कुटुंब शोकसागरात बुडाले होते. विश्वासकुमार यांनी साश्रू नयनांनी भावाला अंतिम निरोप दिला आणि संपूर्ण परिसर हळहळला. मृत्यूच्या दरवाजातून परतलो, पण भावाला वाचवू शकलो नाही, असे ते म्हणाले.

मागील उत्तर (६२६८)

आडवे शब्द – १) असभ्य; गैरवाजवी; वावगा, ४) कणखर, ६) योग्य-अयोग्य; सरस-नीरस, ७) एक वाद्य; पाण्याच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या लहरी, ९) उचल्या, ११) एक प्राणी, १२) विश्व, १३) एक देश, १४) एक काव्यप्रकार (ज्ञानेश्वरी), १५) दर्जा; नक्कल, १६) देणगी, १७) एक नदी, १९) जंगल, २०) लठ्ठ, २१) अन्योन्य, २४) धाडसाचे काम, २६) मेहनती; उलाढाली करणारा, २७) हात; शिक्षा, २८) गोंगाट.

शब्दवेध (६२६९)

उभे शब्द – १) निराळा, २) दलदल, ३) फुलातील रजःकण, ४) व्यवस्थापन; कामकाज; उठाठेव, ५) तुकडा (कागदाचा), ६) नाविक, ७) यात्रा, ८) तरतूद, १०) निर्वाचन, १३) जेवणातील एक भोज्य पदार्थ, १४) तारण; ओलावा, १५) जो पहावा तो, १७) शिक्षा, १८) समेट, १९) मजबूत; थशेराड, २२) कमरपट्टा, २३) एक शस्त्र, २५) पुढे; नंतर.

(उत्तर : पुढील अंकात)

Classifieds
पाहिजेत

Wanted: Primary Teacher on contract basis till April 2026 to teach Classes 1 to 4. Qualification: 12th and D.Ed. Walk-in interview on 26th June 2025 at 9:30 AM at Shri Damodar Balamandir, Loliem, Canacona, Goa. Contact: 7620495353.

Wanted: Multi-Tasking Staff on a regular basis. Minimum qualification: 10th pass. Preference will be given to candidates with a four-wheeler driving license and ITI certification. Apply within 10 days with full biodata and requisite documents to the Headmaster, Shri Damodar Vidyalaya, Loliem, Canacona, Goa. Contact: 9307493172.

Wanted: LDC cum Librarian on a regular basis. Minimum qualification: 12th pass. Preference will be given to candidates with B.Com qualification and knowledge of Tally. Apply within 10 days with full biodata and requisite documents to the Headmaster, Shri Damodar Vidyalaya, Loliem, Canacona, Goa. Contact: 9307493172.

CHANGE IN NAME

I, Alinda Joseph Fernandes r/o H. No. 805/R, Talconda, Raia, Salcete, Goa change my name from Alinda Joseph Pinheiro to Alinda Joseph Fernandes. Hereafter in my dealings and documents I will be known as Alinda Joseph Fernandes.

sd/-
Alinda Joseph Fernandes

Costy's Ads, Chinchinim, Navelim, 9850473904

CHANGE OF NAME

I, **Mr. Joao Pedro Manuel Agnelo Fernandes** (formerly known as **John Seraphin Fernandes**), residing at H.No 5/76, Maddo Vaddo, Calangute, Bardez, Goa - 403516, hereby declare that I have changed my name from **John Seraphin Fernandes** to **Joao Pedro Manuel Agnelo Fernandes** Henceforth, in all my dealings, transactions, and documents, I shall be known by my new name, **Joao Pedro Manuel Agnelo Fernandes.**

CHANGE IN NAME

I, **PRESTON AGNELO ALFONSO**, R/o Flat no 11 Gaffino Tower Belem Navelim, Salcete Goa, Goa 403707 would like to change my name from **PRESTON AGNELO ALFONSO** to **PRESTON AGNELO AFONSO**. Henceforth I will be known as **PRESTON AGNELO AFONSO** in all my document, proceedings and dealings.

BOSS - 9822100065

CHANGE IN NAME

I, **PEDRO ANTONIO ALFONSO**, R/o Flat no 11 Gaffino Tower Belem Navelim, Salcete Goa, Goa 403707 would like to change my name from **PEDRO ANTONIO ALFONSO** to **PEDRO ANTONIO AFONSO**. Henceforth I will be known as **PEDRO ANTONIO AFONSO** in all my document, proceedings and dealings.

BOSS - 9822100065

CHANGE OF NAME

I **Mrs. Nazima Ana Godinho** Resident of Flat no 9, 3rd Floor, Mutual Apt. Gina street, Dr. Dada Vaidya Rd, Panaji, Goa- 403001 declare that I have changed my Name from **Mrs. Nazima Ana Fernandes** to **Mrs. Nazima Ana Godinho** ,Henceforth I will be known as **Mrs. Nazima Ana Godinho** in all my documents, proceedings and dealings and also for the purpose of passport.

CHANGE OF NAME

I, Mrs. **LIBANIA CYRILA COLACO**, wife of **SAVIO JORGE BARRETO** residing at **BLOCK - 2, NEAR J P ANDRADE RESIDENCY BORDA, MARGAO, SALCETE, SOUTH GOA - 403602**, has changed my name from **LIBANIA CYRILA COLACO E BARRETTO** to **LIBANIA CYRILA COLACO.**
Hereafter, in all my dealings & documents, I will be known by the name **LIBANIA CYRILA COLACO.**

Sd/- LIBANIA CYRILA COLACO

COMUNIDADE OF LOLIEM-POLEM
CANACONA TALUKA, GOA

Ref. No. COM/LP/ Date:

Comunidade of Loliem Polem
Notice

The above mentioned Comunidade is hereby convened for an extraordinary general body meeting in ordinary form on 06th July, 2025 at 10.30 a.m.at its usual meeting place, in the Sabhamandap of shri Keshav Devalaya Loliem, after the publication of notice in the Official Gazette in order to discuss and decide on the below mentioned subject matter.

1. To discuss on the application received from Vadenagar Shikshan Seva Mandal, Vasco requesting for suitable land admeasuring 50,000 square meters for setting up Sainik School for the state of Goa.
3. To discuss on the application received from POLEM CRICKET CLUB, requesting for grant of land for development of Cricket Ground.
4. To discuss on the application received from CONCORD INNOVATIONS PVT LTD, MUMBAI for lease of land admeasuring an area of 15 lakh square meters for setting up 100 MW Solar Power Plant Peoject for the state of Goa.
5. To discuss on the Letter received from PROJECT CELL, SPECIAL PURPOSE VEHICLE (GTDC LTD.) PARYATAN BHAVAN PATTO PANAJI For allotment of land for construction of wayside amenities for the benefit of tourists.
6. To discuss on the Construction of building for comunidade of loliem polem for setting up office, shops and Multipurpose hall to generate revenue.

Loliem,
12th June, 2025.
The LDC / Seal Sd/-
Escrivao, Mr. Uday Desai.

UNIMONI FINANCIAL SERVICES LIMITED
RO: N.G. 12 & 13 Ground Floor, North Block, Manipal Centre, Dickenson Road, Bangalore - 560 042. | CIN No. U85110KA1995PLC018175

सार्वजनिक नोटिस

याद्वारे जनतेला कळविण्यात येते की, तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या लिलाव UNIMONI FINANCIAL SERVICES LIMITED द्वारे 23.06.2025 रोजी सकाळी 10.00 वाजता खाली दिलेल्या संबंधित केंद्रावर आयोजित केला जाईल. लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने आमच्या विविध ग्राहकांच्या कर्ज खात्यातील आहेत ज्यांनी त्यांची थकबाकी भरली नाही. या कर्जदारांना आमच्या लिलावाच्या नोटिसा रीतसर बजावण्यात आल्या आहेत, लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने शाखेच्या नावासह खाली नमूद केलेल्या आमच्या विविध ग्राहकांच्या थकीत कर्ज खात्यांचे आहेत.

Auction Centre Address & Loan Nos: MAPUSA (MSA - Shop No 7 -8First Floor, Atria Buildingnear Court Junction, Mapusa - 403507, Contact No: 7994333912) 2158527, 2162096.

(Reserves the right to alter the number of accounts to be auctioned &/ postpone / cancel the auction without any prior notice)

VILLAGE PANCHAYAT SOCORRO Bardez, Goa 403501

Ref. No. VP/SOC/ 760 /2025-2026 **NOTICE INVITING QUOTATIONS** Date: 18.06.2025

The Sarpanch of Village Panchayat Socorro invites the sealed quotations on behalf of Village Panchayat Socorro from the eligible suppliers to supply the below mentioned material to Village Panchayat Office, Socorro on or before 26/06/2025 up to 12.30 p.m. The Particulars of material to be supplied are as under:

Sr. No.	Description	Quantity
1.	Office Almar with one locker and other shelf Size 77"x36"x18" Heavy Gauge	07 Nos.
2.	Plastic Chair (**Without Arm**)	1400 Nos.
3.	Concave/ Convex Mirror (Traffic Mirror) 32" along with Installation	50 Nos.

The terms & conditions & other particulars for the quotation are as follows: **1.** The Quotation shall reach in the Office of Village Panchayat Socorro, Bardez, Goa on or before 26/06/2025 upto 12.30 p.m. **2.** Received Quotation will be opened on 28/06/2025 at 12.00 p.m. in the Village Panchayat Meeting. **3.** The Lowest Quotation will be accepted. **4.** Payment shall be made after the delivery of the goods in good condition at Village Panchayat Office **5.** Income Tax, GST or any other taxes should be mentioned on the quotations. **6.** Incomplete quotation and quotation received later on beyond the specified time period will be rejected. **7.** The right of accepting or rejecting any or all Quotations received without assigning any reason is reserved by the Village Panchayat Socorro. **8.** For any Query/Details, may contact to Village Panchayat Socorro. Seal Sd/- **Sarpanch, Village Panchayat Socorro**

स्टेट बँक ऑफ इंडिया
एएमसीसी पणजी, दुसरा मजला, पणजी मुख्य शाखा, डी. बी. रोड, पणजी, गोवा 403 001
दूरध्वनी क्र. 0832 2420337; **फॅक्स:** 2420229
ईमेल: sbi.10290@sbi.co.in

ताबा सूचना

ज्याअर्थी, खाली सही करणारा हा स्टेट बँक ऑफ इंडिया, एएमसीसी पणजी शाखा, यांचा अधिकृत अधिकारी असल्याने त्याने सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स 2002च्या नियम 9सह वाचण्यात येणाऱ्या कलम 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करीत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत **09.04.2025** रोजी मागणी सूचना जारी करण्यात आली होती ज्यामध्ये कर्जदार **श्री. अमित गौर फ्लॅट नं 001, 'ए' मोनार्क पाम्स मुड्डो पेक्वेनो, क्र. 29/1-ए, कांदोळी, बार्देश, गोवा 403515 यांना सूचनेत नमूद रक्कम रु. 75,90,592.89/- (रुपये पंचाहत्तर लाख नव्वद हजार पाचशे ब्याण्णव आणि एकोणनव्वद पैसे फक्त) 08.04.2025** प्रमाणे सोबत उपरोक्त रकमेवरील करारानुसार भविष्यातील व्याज आणि देयकाच्या तारखेपर्यंत करावयाचे आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादींसह, अशी रक्कम ही नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत भरण्यास सांगितले होते.

उपरोल्लेखीत कर्जदार आणि इतर रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, येथे विशेषत: वर उल्लेख केलेल्या कर्जदारांना आणि इतरांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरी करणाऱ्याने या कायद्याच्या उक्त नियमांच्या नियम 9 सह वाचला जाणाऱ्या कलम 13 (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे, जो खाली दिलेल्या तक्त्यात नमूद केलेल्या तारखांना सिक्युरिटायझेशन (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियमासह वाचा.

कर्जदारांना आणि विशेषत: वर उल्लेख केलेल्या इतरांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला येथे इशारा देण्यात येतो की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास बँकेला **08.04.2025 प्रमाणे रुपये 75,90,592.89 (रुपये पंचहत्तर लाख नव्वद हजार पाचशे ब्याण्णव आणि एकोणनव्वद पैसे फक्त)** शुल्क आकारले जाईल, ज्यामध्ये सदर मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवण्यात आली आहे आणि **08.04.2025** पासून होणारे/करण्यात येणारे आनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादींचा समावेश असेल.

कर्जदार/ हमीदारांचे नाव	अचल मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचनेची तारीख	ताबा घेण्याची तारीख	सूचनेप्रमाणे थकीत रक्कम
श्री. अमित गौर	फ्लॅट क्र. 001, 'ए' मोनार्क पाम्स मुड्डो पेक्वेनो, क्र. 29/1-ए, कांदोळी, बार्देश, गोवा	09/04/2025	12/06/2025	रुपये 75,90,592.89 सोबत त्यावरील पुढील व्याज, खर्च आणि इतर शुल्क इ.

ठिकाण : पणजी - गोवा
दिनांकित : 18.06.2025

सही/-
अधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया, एएमसीसी, पणजी गोवा

द साऊथ इंडियन बँक लि.
संकलन व वसुली विभाग- मुंबई,
तळमजला, 'सी' बिल्डिंग, चित्रपूर को-ऑपरेटिव्ह, गृहनिर्माण संस्था, पांडुरंग मार्ग, 27 वा रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई-400050. ईमेल: ro1001@sib.co.in

ई-लिलाव विक्री सूचना

संदर्भ: आरओएमयूएम/बीआर0661/विक्री-पीपी/24ए/2025-26 दिनांकित: 16.06.2025
सेक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 च्या 8(6) आणि नियम 9 (1) साठी प्रोव्हिसोसह वाचण्यात येणाऱ्या सेक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

कर्जदार - 1. श्रीमती. प्रियंका प्रकाश शिरोडकर, घर क्र. 29/10, रो हाऊस क्र. 3, रेहान्स रो हाऊस सिंधु नगर, गंगानगर, कुर्टी, फोंडा, गोवा, पिन – 403401, आणि इथेही ई/106, वाड्डो-7, मिलाग्री चर्चच्या जवळ, गांवसवाडो, म्हापसा, उत्तर गोवा, गोवा, पिन-403507

2. श्री. रईल रामदास नाईक, घर क्र. 29/10, रो हाऊस क्र. 3, रेहान्स रो हाऊस सिंधु नगर, गंगानगर, कुर्टी, फोंडा, गोवा, पिन – 403401, आणि इथेही ई/106, वाड्डो-7, मिलाग्री चर्चच्या जवळ, गांवसवाडो, म्हापसा, उत्तर गोवा, गोवा, पिन-403507

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता द साउथ इंडियन बँक लिमिटेड (सुरक्षित कर्जदार) यांच्याकडे गहाण ठेवले आहे, ज्याचा भौतिक ताबा द साउथ इंडियन बँक लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे आणि द साउथ इंडियन बँक (सुरक्षित कर्जदार), यांची दिनांकित 15.06.2025 प्रमाणे द साऊथ इंडियन बँक लिमिटेड, फोंडा शाखा (सुरक्षित धनको), यांचे वरील नमूद कर्जदार आणि गहाणखतदार यांच्याकडून **रु. 49,04,601.74/- (रुपये एकोणपन्नास लाख चार हजार सहाशे एक आणि चौऱ्याहत्तर पैसे फक्त)** सोबत पुढील व्याज, खर्च आणि शुल्क इ. रक्कम उपरोक्त कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून वसूल करण्यासाठी दिनांकित **10.07.2025** रोजी **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे"** आणि **"जे जे काही आहे ते"** या आधारावर विक्री करण्यात येईल.

मालमत्ता मालकाचे नावः श्रीमती. प्रियंका प्रकाश शिरोडकर आणि श्री. रईल रामदास नाईक

मालमत्तेचे वर्णनः- निवासी दुप्लेक्स बंगला क्र. 3 येथे असलेल्या त्या मालमत्तेचा सर्व अविभाज्य भाग, 117 चौ.मी. (अंदाजे) मोजमाप, कुर्टी-खांडेपार ग्रामपंचायतीमधील 'रेहान्स रो हाऊस' म्हणून ओळखले जाणारे बिल्डिंग कॉम्प्लेक्स, सोबत प्लॉट क्र. 39 आणि 40 मधील आनुपातिक अविभाजित शेअरसह सामायिक क्षेत्र आणि सुविधांवरील समान अधिकार, 239.25 चौ.मी. आणि 214.50 चौ.मी. चे मोजमाप अनुक्रमे, आणि 26075 चौरस मीटरच्या मोठ्या प्रमाणात मालमत्तेचा भाग बनते, आणि 'सालेमभात' तसेच 'तांबोनोगुडो' किंवा 'गोरभाट' किंवा 'चालेभ आटकुस्ती' असे म्हणूनही ओळखले जाते, इल्हासच्या जमीन नोंदणी कार्यालयात पुस्तक क्र.15 (नवीन) चे (उलट) पान क्र.171 वर वर्णन क्र.5811 अंतर्गत वर्णन, आणि फोंडाच्या तालुका महसूल कार्यालयात मॅट्रिझ प्रिडायल क्र. 340 ते 347 अंतर्गत नोंदणीकृत, महसूल गाव फोंडाच्या नवीन सर्व्हे क्र. 68/1 अंतर्गत, उत्तर गोवा जिल्हा आणि श्रीमती प्रियंका प्रकाश शिरोडकर आणि श्री रईश रामदास नाईक यांच्या मालकीची, दिनांकित 31.08.2015 च्या सेल डीडमध्ये पूर्णतः वर्णन आणि दस्तऐवज क्रमांक: 2343/2015 दिनांकित 23.10.2015 रोजी उप-निबंधक कार्यालय फोंडा येथे नोंदणीकृत आणि बंगला क्र. 3 च्या सीमारेषा टायटल डीडनुसार खालीलप्रमाणेः **उत्तरेसः** 10 मीटर रुंद रस्ता, **पूर्वेसः** रो हाऊस क्र. 2, **दक्षिणेसः** ओपन गार्डन, **पश्चिमेसः** रो हाऊस क्र. 4
मेसर्स रेहान कन्स्ट्रक्शनसने कुर्टी-खांडेपार ग्रामपंचायतीला सादर केलेल्या जितेंद्र डी देवारी यांच्या स्केचनुसार भूखंडाच्या सीमा. प्लॉट क्र. 39 च्या सीमारेषाः **उत्तरेसः** 10 मीटर रुंद अंतर्गत रस्ता **पूर्वेसः** प्लॉट क्र. 40, **दक्षिणेसः** खुल्या जागेनुसार, **पश्चिमेसः** 6 मीटर रुंद अंतर्गत रस्ता प्लॉट क्र. 40 च्या सीमारेषाः **उत्तरेसः** 10 मीटर रुंद अंतर्गत रस्ता, **पूर्वेसः** प्लॉट क्र. 41
दक्षिणेसः खुली जागा **पश्चिमेसः** प्लॉट क्र. 39

आरक्षित मूल्य : रु. 79,32,000/- (रुपये एकोणऐंशी लाख बत्तीस हजार फक्त)

अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) - रु. 7,93,200/- (रुपये सात लाख त्र्याण्णव हजार दोनशे फक्त) ईएमडी रु. 09.07.2025 रोजी दुपारी 4 पर्यंत किंवा तत्पूर्वी भरावी लागेल.

बोली वाढ किंमत : रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)

ई-लिलावाची तारीख आणि वेळः- 10.07.2025 दुपारी 12 ते दुपारी 1 या वेळेत (विक्री संपेपर्यंत 5 मिनीटांच्या अमर्यादित ऑटो विस्तारासह)

बँकेला ज्ञात असलेले भार – वर्ष 1996 पासून 10.06.2025 पर्यंत कोणताही भार नाही

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया साउथ इंडियन बँक लिमिटेडच्या वेब पोर्टलवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या, (सुरक्षित कर्जदार) वेबसाइट अर्थात www.southindianbank.com तपशील https://bankauctions.in वर देखील उपलब्ध आहेत.

मालमत्तेची तपासणी, ई-लिलावाच्या अटी व शर्ती किंवा बोली सादर करण्याबाबत पुढील कोणत्याही स्पष्टीकरणासाठी कृपया साउथ इंडियन बँक लिमिटेडशी क्र. 8879278772 वर साऊथ इंडियन बँक लिमिटेड इथे संपर्क साधता येतो.

दिनांकितः 16.06.2025 **अधिकृत अधिकारी**
ठिकाणः मुंबई **(सहायक महाव्यवस्थापक)**